# व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय

## जाहिरात

**विषय : सेवानिवृत्त गट- अ (वेतनस्तर एस २५ किंवा त्यापेक्षा अधिक) यांची कंत्राटी तत्वावर विवक्षित कामांसाठी नियुक्त करणेबाबत जाहिरात.**

**दिनांक - २०/०२/२०२६**

| अ.क्र. | पद संख्या | पात्रता | मानधन |
|---|---|---|---|
| १ | ०१ | विवक्षित कामासाठीचा अर्जदार हा वनविभागातून गट- अ (वेतनस्तर एस २५ किंवा त्यापेक्षा अधिक) या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.<br>सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडे बांबू प्रशिक्षण व संशोधन क्षेत्रात कमीत कमी ३ वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. बांबू उत्पादनोत्तर प्रक्रिया व विपणन / मोठे वानिकी प्रकल्प उभारणे तसेच वनप्रशिक्षण क्षेत्रात अनुभव असलेल्या आणि मुख्य वनसंरक्षक दर्जाचे किंवा त्यापेक्षा वरीष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना प्राधान्य. | सेवानिवृत्त अधिका-याचे मानधन हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१०/०६/२०२५ नुसार राहील. |

**अटी व शर्ती :**

१) प्राप्त अर्जापैकी पात्र अर्जदारांकडून वरील तक्त्यात दर्शविलेल्या संख्याप्रमाणे नामिकासूची तयार करण्यात येईल. अर्जदारास प्रामुख्याने नागपूर येथे राहून सेवा प्रदान करावी लागेल.

२) नेमणूक केलेल्या सेवानिवृत्त अधिका-याचे मानधन हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ नुसार राहील.

३) अर्जाचा नमूना www.mahafortest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) अर्ज करण्याची शेवटची तारीख सदर पदाकरीता अर्ज, नमूद पात्रता व अनुभव संबंधातील आवश्यक दस्ताऐवजासह **दिनांक ०२/०३/२०२६** पर्यंत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ कार्यालय, नविन काटोल नाका चौक, गोरेवाडा रोड, नागपूर- ४४००१३ या पत्त्यावर सादर करावे. अथवा mahabamboo@mahaforest.gov.in या ई-मेल वर पाठविण्यात यावे.

## (अर्जाचा नमूना)

**जाहीरात क्र. MBDB- १५ /२०२५-२६**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पुर्ण नांव | |
| २ | जन्म दिनांक | |
| ३ | अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | अर्जदाराचा पत्ता | |
| ५ | अर्जदाराचा ई-मेल | |
| ६ | सेवा निवृत्तीचा दिनांक | |
| ७ | सेवा निवृतीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ८ | सेवा निवृत्तीच्या वेळी वेतन श्रेणी | |
| ९ | सेवा तपशिल (सेवेत लागल्यापासून सेवानिवृत्त होईपर्यंतचा सेवा तपशिल नमूद करावा.) | |
| १० | जाहीरातीमध्ये नमूद अनुभव असल्यासंबंधीचे दस्ताऐवज व तपशिल जोडावे. | |

## प्रमाणपत्र

मी याव्दारे प्रमाणित करतो की, माझे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू अथवा प्रस्तावित नाही किंवा अश्या चौकशी प्रकरणी मला कोणतीही शिक्षा झालेली नाही. वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा असून त्यात तफावत आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

दिनांक :<br>स्थळ :

(पुर्ण नांव व स्वाक्षरी)